# मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे कक्ष
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओस्तवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट :- ४८४/२०२२** **दिनांक – १३/०४/२०२२**

## मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी
## २२ तक्रारदारांची १०,००,०००/- रुपयाची फसवणूक रक्कम परत मिळवून देण्यात यश
## सन २०२२ मधील १०० दिवसातील कामगिरी

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय अंतर्गत सायबर विषयक तक्रारींची चौकशी व सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता गुन्हे शाखा अंतर्गत सायबर गुन्हे कक्ष कार्यरत आहे.

सायबर गुन्हे कक्ष येथे दिनांक ०१ जानेवारी २०२२ रोजी ते आजपावेतो (मागील १०० दिवसाच्या कार्यकाळात) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालयातील रहीवाशी नागरिकांनी ऑनलाईन फसवणूकीच्या तक्रारी अर्ज दिलेले आहेत, सदर तक्रारी अर्जांची तात्काळ दखल घेवून सायबर गुन्हे कक्षाकडून २२ तक्रारदार नागरीकांची फसवणूक झालेली रक्कम ज्या बँक/पेमेंट गेटवे/शॉपिंग वेबसाईट/गेमिंग वेबसाईट मध्ये वर्ग झालेली होती, त्यांचेशी पत्रव्यवहार करुन व समन्वय साधुन एकुण १०,००,०००/- रुपये (दहा लाख रुपये) परत मिळवून देण्यात यश आलेले आहे. **तक्रारदार यांचे अर्ज चौकशीमध्ये तक्रारदार यांना न्यायालयीन प्रक्रीयेविना सदरची रक्कम परत मिळवून देण्यात आली आहे.**

सायबर गुन्हे कक्ष येथे प्राप्त होणा-या तक्रारींचे स्वरुप पाहता खालील प्रकारे नागरिकांची ऑनलाईन फसवणूक होत असल्याचे दिसून येत आहे. - Sim Card, Bank Account (KYC Update), Fake Customer Care Number Searching From Google., Reward Points, Gift Voucher, Lottery, Huge Discounts, Work From Home, Online Food+Products Order With Low Price Links, OLX Shopping, Selling or other Ways (**QR Code Scanning for Payments.**), Fraud Loan App Installing & Giving all Access Permission (**Contact, Media, Location etc….),** Facebook, What's app or other Social Media Video Call & Asking Money (**For Not Sharing Video on Social Sites or Contacts....**)

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय क्षेत्रात राहणाऱ्या नागरीकांना जाहीर आवाहन करण्यात वरील नमुद सायबर फसवणूकीचा प्रकार आपल्यासोबत सुध्दा होवू शकतो त्यामुळे ऑनलाईन व्यवहार करतांना सतर्क राहावे. तसेच **ऑनलाईन व्यवहार करताना आपली फसवणूक झाल्यास तात्काळ www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी. तात्काळ तक्रार नोंदविल्यास फसवणूक झालेली रक्कम थांबविण्यात व तक्रारदाराच्या मुळ खात्यात परत जमा करण्याची शक्यता जास्त असते.**

सदरची कामगिरी मा. श्री. डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री. अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुजितकुमार गुंजकर, पोनि/ सायबर गुन्हे शाखा, श्री. स्वप्निल वाव्हळ, सपोनि /सायबर गुन्हे शाखा, श्री.प्रसाद शेनोळकर, पोउनि/सायबर गुन्हे शाखा, पोअंम/१२०९२ प्रविण आव्हाड, पोअंम/१२०९५ गणेश इलग, मपोशि/सुवर्णा माळी, सेल, मपोशि/ माधुरी धिंडे, मपोशि/ पल्लवी निकम सायबर क्राईम सेल यांनी केली असुन चालू वर्षी सन २०२२ मध्ये १०० दिवसांमध्ये एकुण २२ तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम १०,००,०००/- रुपये रक्कम तक्रारदारांना परत मिळवून देण्यात आलेली आहे.

-----oooo----